# प्रस्तावना

# प्रस्तावना

अ) **प्रस्तावना**

माहिती संकलन

अभ्यासाचा कालावधी

आराखडा

ब) **बार्शी शहराची तोंडओळख**

१. बार्शी शहराची धार्मिक व ऐतिहासिक तोंड ओळख

२. बार्शीची सामाजिक व सांस्कृतिक वाटचाल

३. बार्शीची शैक्षणिक वाटचाल

४. बार्शीची व्यापारी व औद्योगिक वाटचाल

५. बार्शी शहराने साहित्याला दिलेले साहित्यीक व साहित्यसेवा

६. वैद्यकिय सेवेची वाटचाल

७. बार्शी शहराचे सहकारी चळवळीतील योगदान

## अ) प्रस्तावना

अभ्यासासाठी बार्शी नगरपालिका निवडण्यात आली आहे. बार्शी तालुका हा कायम अवर्षणप्रवण भागामध्ये येतो. दर दहा वर्षातुन एखादा मोठा दुष्काळ तर दर दोन तीन वर्षातुन किरकोळ अवर्षणाची स्थिती या भागामध्ये निर्माण होते. शहराच्या विकासामध्ये नगरपालिकेला खूप महत्व असते. बार्शी नगरपालिका ही दुष्काळी भागामध्ये येते. त्यामुळे दुष्काळी भागातील नगरपालिका म्हणून प्रशासन चालविण्यामध्ये बार्शी नगरपालिकेस कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते हे जाणून घेण्याचे प्रमुख उद्दिष्ट हा विषय निवडण्यामागे आहे.

लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये नागरी जीवनामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व अनण्यसाधारण आहे. लोकोपयोगी सुविधांची निर्मिती व त्यांचे वाटप न्याय्य व कार्यक्षमरित्या होण्यासाठी त्याच्या देखीभालीची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थाकडेच असणे व्यवहार्य व आवशक मानले गेले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या नव्या धोरणानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व व राष्ट्राच्या विकासकामातील त्यांची भूमिका महत्वपूर्ण आहे. राज्य सरकार किंवा केंद्र सरकार यांच्या हस्तक्षेपाशिवाय त्यांचे कार्य होणे अपेक्षित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची दोन पातळ्यांवर विभागणी करण्यात आली आहे. ग्रामीण भागामध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद तर शहरांसाठी महानगरपालिका आणि नगरपालिका अशी प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्यात आली.

आज विविध स्थित्यंतरामुळे शहरी भागामध्ये सार्वजनिक वितरणव्यवस्था , प्रशासन, पोलिसव्यवस्था इ. नागरी सोयी सुविधांवर ताण पडत आहे. जगण्याची तीव्र स्पर्धा, जागेची टंचाई , पाण्याची टंचाई , हवा , पाणी , ध्वनी व जमीन यांचे प्रदुषण, रोगराई , गुन्हेगारी इत्यादी कारणे त्यामागे आहेत. यात भर म्हणून शिक्षण , नोकरी , व्यवसाय , रोजगार, शहरी जीवनाविषयीचे आकर्षण , सोयी सुविंधाची उपलब्धता , सामाजिक सुरक्षितता इ. कारणामुळे ग्रामीण भागातील लोक शहरांमध्ये स्थलांतरीत

होत आहेत. शहरी समाजाच्या बदलत्या महत्वकांक्षा आणि गरजांच्या प्रचंड रेट्यामुळे नगरपालिका प्रशासनाची रचना व त्यांच्या समोरील प्रश्नांचे स्वरुप अमुलाग्रपणे बदलले आहे.

बार्शी नगरपालिकेने २००७ मध्ये १४२ वर्ष पूर्ण केलेली आहेत. १९९० मध्ये १२५ वर्ष पूर्ण केल्यानिमित्त रौप्यमहोत्सवी वर्षही साजरे केले आहे. त्यावेळी नगरपालिकेच्या प्रगतीचा इतिहास खास गौरवग्रंथाव्दारे प्रसिध्द करण्यात आला. यादृष्टिने बार्शी शहराचे भौगोलिक स्थान व रचनेचा अभ्यास, बार्शी नगरपालिकेचा घटनात्मक इतिहास , नगरपालिकेने पाणीपुरवठा व दुष्काळनिवारण यासाठी राबविलेल्या योजना यांचा एकत्रितपणे अभ्यास व्हावा ही यामागची मुख्य प्रेरणा आहे. हे सर्व करत असताना नगरपालिकेला कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले त्याचाही शोध घेण्याचा हेतू हा विषय निवडण्यामागे आहे.

## माहिती संकलन :

माहिती संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग केलेला आहे. या लघुप्रबंधासाठी अप्रकाशित साधने तसेच प्रकाशित साधने यांचाही वापर माहिती संकलनासाठी केलेला आहे.

### अ) अप्रकाशित साधने

अप्रकाशित साधनांमध्ये बार्शी नगरपालिकेने वेळोवेळी तयार केलेले वार्षिक अहवाल, अंदाजपत्रके , सरकारी ठराव , सभावृतांत याचबरोबर नगरपालिकेच्या कार्यालयातील अप्रकाशित नोंदी यांचाही आधार घेऊन माहिती अद्ययावत व विश्वासार्ह करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचप्रमाणे विविध सामाजिक , राजकिय संस्था व संघटनांचे अहवाल , वैयक्तिक दैनंदिनी यांचाही वापर करण्यात आला आहे. राष्ट्रसेवादलाच्या वतीने तयार केलेले दल 'प्रदीप ' या हस्तलिखितामधील राजकिय ,

सामाजिक , आर्थिक बाबींवर लिहिलेले वेगवेगळे लेख यांचाही वापर माहिती संकलनाकरीता करण्यात आलेला आहे.

**ब) प्रकाशित साधने**

प्रकाशित साधनांमध्ये नगरपालिकेने प्रकाशित केलेले गौरग्रंथ, स्मरणिका , रौप्य महोत्सवी ग्रंथ , शताब्दी महोत्सव स्मृतीग्रंथ , विशेषांक त्याचप्रमाणे विविध मान्यवरांचे गौरवांक, स्थानिक वर्तमानपत्रे , साप्ताहिके , पाक्षिके , मासिके, वर्तमानपत्रे, प्रकाशित ग्रंथ व पुस्तके यांचा वापर माहिती संकलनाकरीता करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे नगरपालिकेतील संबंधित विभागातील अधिकारी , कर्मचारी, तसेच नगरपालिकेचे आजी - माजी पदाधिकारी , नगराध्यक्ष, नगरसेवक , जेष्ठ नागरिक यांच्याशी औपचारिक व अनौपचारिक चर्चेतून मिळालेल्या माहितीचा उपयोग प्रबंधासाठी केलेला आहे. अभ्यासक स्वत: बार्शी तालुक्यातील व बार्शी शहराशी संबंधीत असल्यामुळे स्वत:च्या अनुभव व निरीक्षणांचाही आधार म्हणून उपयोग केलेला आहे.

वरील उपलब्ध झालेल्या सर्व माहितीचे विश्लेषण करुन त्यामधील निष्कर्ष काढून काही सूचनादेखील मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**अभ्यासाचा कालावधी :**

अभ्यासासाठी निश्चित असा कालावधी निवडलेला नाही. परंतु,बार्शी नगरपालिकेची स्थापणा १८६५ मध्ये झाली. नगरपालिकेच्या स्थापणेपासून २००८ पर्यंतच्या कालावधीमध्ये बार्शी शहराच्या विकासासाठी नगरपालिकेची काय भूमिका राहिली आहे याचा विचार केलेला आहे.

**संशोधन कार्यपध्दती :**

या प्रबंधासाठी ऐतिहासिक अभ्यासपध्दतीची निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर नगरपालिकेने प्रकाशित केलेले अहवाल , विशेषांक स्मरणिका , अप्रकाशित

अहवाल , सभावृतांत , कार्यालयातील नोंदी , प्रकाशित पुस्तके व ग्रंथ यामधील माहिती आणि नगरपालिकेतील त्या - त्या विभागातील आजी व माजी पदाधिकारी , जेष्ठ नागरिक यांच्याशी औपचारिक व अनौपचारिक चर्चेतून आणि प्रत्यक्ष निरीक्षणातून जी माहिती मिळाली त्या आधारे सुसंगत , सुसंबंध व साधार असे विवेचन करण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधामध्ये केलेला आहे.

**अभ्यासाची योजना / आराखडा :**

अभ्यासाच्या सोयीसाठी या शोधनिबंधाची खालील प्रकरणांमध्ये विभागणी करण्यात आली आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये बार्शी तालुक्याचे भौगोलिक स्थान व शहराच्या रचनेचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये बार्शी तालुक्यामध्ये दुष्काळ पडण्यामागच्या विविध कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये बार्शी नगरपालिकेचा स्थापणेपासुनचा ऐतिहासिक आढावा घेण्यात आलेला आहे. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचा उदय , विविध टप्प्यावरती स्थानिक स्वराज्य संस्थेचा झालेला विकास , बार्शी नगरपालिकेच्या स्थापणेपासूनचा स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील घटनात्मक इतिहास याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये बार्शी नगरपालिकेने पाणीपुरवठा व दुष्काळनिवारणासाठी कोणकोणते प्रयत्न केले? कोणत्या योजना राबविल्या यांचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये नगरपालिकेने शहरासाठी राबविलेल्या चांदणी प्रकल्प, पाथरी पाणीपुरवठा योजना , शहरातील विविध विहीरी व विंधण विहीरी, ओव्हर, ऑलसिटी डिस्ट्रीब्यूशन स्कीम, अभिवर्धन योजना, बार्शी कुर्डूवाडी संयुक्त पाणीपुरवठा योजना यांचा तपशीलवार आढावा घेण्यात आलेला आहे.

पाचव्या प्रकरणामध्ये वरील प्रकरणांच्या तपशीलातून शेवटी काही निष्कर्ष व सूचनांची मांडणी केलेली आहे.

## ब) बार्शी शहराची तोंडओळख

बार्शी नगरपालिकेने २००७ मध्ये १४२ वर्षे पूर्ण केलेली आहेत. १९९० मध्ये नगरपालिकेने १२५ वर्षे पूर्ण केली व त्यानिमित्ताने शतकोत्तर रौप्य महोत्सवही साजरा केला. १९३६ मध्ये बार्शी नगरपालिकेला "बरो" म्युनिसिपालिटीचा दर्जा प्राप्त झाला. १४ नोव्हेंबर १९६५ रोजी बार्शी नगरपालिकेला शंभर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल नगरपालिकेने " शताब्दी महोत्सव ही " साजरा करण्यात आला . त्या त्या वेळी नगरपालिकेच्या प्रगतीचा इतिहास खास गौरवग्रंथाव्दारे प्रसिध्द् करण्यात आला.

सोलापूर जिल्हृयातील बार्शी हे क्रमांक दोनचे शहर अंबरीषवरद श्री. भगवंताची ही पुण्यप्रद नगरी असून संत नामदेवांचे गुरु विसोबा खेचर , संत जोगा परमानंद महाराज , यासारख्या सिध्द पुरुषांच्या वास्तव्याने पुनीत झालेले हे गाव असून महाराष्ट्रातील एक महत्वाचे औद्योगिक , शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्र म्हणून बार्शी शहराची ख्याती आहे. व मराठवाड्याचे प्रवेशव्दार म्हणून महत्वपूर्ण स्थान प्राप्त झालेले आहे. अशा या शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थेने १४२ वर्षाचा कालखंड यशस्वीरित्या पूर्ण करावा ही अत्यंत गौरवाची बाब होय. यानिमित्ताने बार्शी शहराचे भौगोलिक स्थान व रचनेचा अभ्यास , बार्शी नगरपालिकेचा ऐतिहासिक आढावा , बार्शी तालुक्यामध्ये दुष्काळ पडण्याची कारणे , बार्शी नगरपालिकेने दुष्काळनिवारण व पाणी पुरवठ्यासाठी राबविलेल्या योजना यांचा एकत्रितपणे अभ्यास व्हावा यासाठी हा विषय निवडलेला आहे. त्याचप्रमाणे बार्शी शहराची धार्मिक व ऐतिहासिक तोंडओळख , शहराची सामाजिक व सांस्कृतिक वाटचाल , शैक्षणिक वाटचाल, व्यापारी व औद्योगिक परंपरा तसेच वैद्यकिय सेवेची वाटचाल , बार्शीचे सहकारी चळवळीतील योगदान, बार्शी शहराने साहित्याला दिलेले साहित्यीक व साहित्यसेवा याचा थोडक्यात आढावा या प्रकरणामध्ये घेण्यात आलेला आहे.

## १ बार्शी शहराची धार्मिक व ऐतिहासिक तोंडओळख :

महाराष्ट्राच्या अध्यात्मिक व पारमार्थिक क्षेत्रात ज्याप्रमाणे क्षेत्र पंढरपूराचे स्थान महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे " भगवंताची बार्शी " म्हणून या नगरीचा महिमा वर्णिला जातो. श्री विष्णूचे " भगवंत " या नावाने प्रसिध्द असलेले मंदिर अखिल भारतात फक्त बार्शी नगरीतच आहे. या नगरीचे पुरातन नाव " व्दादशीक्षेत्र " असे आहे. व्दादशी या संस्कृत शब्दास प्राकृत भाषेत " बारस " असा शब्द आहे. त्यामुळे व्दादशीक्षेत्र या मूळ नावापासुनच बारस - बारसपूर - बारशी - बार्शी असे या शहराचे सध्याचे नाव प्रचलित आहे. " बार्शी " या नावाची उत्पत्ती अणखी एक प्रकारे सांगितली जाते. " अंबशेष विजय " या ग्रंथात या नगरीमधील बारा पवित्र तीर्थस्थळांचा उल्लेख आहे.

| | | |
|---|---|---|
| १. श्री. भगवंत तीर्थ | २. श्री. आरेश्वर तीर्थ | ३. श्री. लक्ष्मी तीर्थ |
| ४. श्री गणेश तीर्थ | ५. श्री. मल्लिकार्जून तीर्थ | ६. श्री एकविराई तीर्थ |
| ७. श्री. संकेश्वर तीर्थ | ८. श्री. बाळेश्वर तीर्थ | ९. श्री. भोगेश्वर तीर्थ |
| १०. श्री. नरसिंह तीर्थ | ११. श्री काळभैरव तीर्थ | १२. श्री. पंक तीर्थ |

या १२ पवित्र तीर्थाच्या अस्तित्वावरुन बाराशिव असे नाव प्राप्त झालेले असावे व त्यावरुन बारशी असे रुपांतर झालेले नाव मिळाले असावे. त्याचप्रमाणे बार्शीमध्ये १२ शिवमंदिरेही आहेत. त्यावरुनही बारशी हे नाव प्राप्त झालेले असणे शक्य आहेत.

संशोधकांच्या मते बार्शीचे सध्याचे भगवंत मंदिर तेराव्या शतकापूर्वीपासून अस्तित्वात असावे. हेमाडपंथी रचनेवरुन या मतास पुष्टी मिळते. इ. स. १२४५ दरम्यान सध्याच्या मंदिराची मूळ स्वरुपात रचना झाली असावी. भगवंताची मुर्ती चतुर्भूज शाळीग्राम पाषाणाची असून अत्यंत सुबक व आकर्षक आहे. शंख , चक्र, गदा व पद्मधारी अशा या मूर्तीच्या दक्षिण हस्ताखाली अंबरोषाची मूर्ती कोरलेली असून भगवंताच्या पाठीमागे लक्ष्मीची मूर्ती कोरलेली आहे. भगवंताच्या मंदिरात लाकडी मंडपात अत्यंत सुबक अशी गरुडाची संगमरवरी मूर्ती शिल्पकलेचा उत्कृष्ठ नमुना आहे त्यास " गरुड खांब "

म्हणतात. दक्षिणेकडील ओवरीत श्री. ज्ञानेश्वरांची मूर्ती असून मुख्य मंदिराच्या उत्तरेस श्री दत्त मंदिर आहे. त्याचप्रमाणे श्री. जोगापरमानंदाची समाधीही आहे.

### ऐतिहासिक तोंड ओळख :

ऐतिहासिक दृष्ट्याही बार्शी नगराचे महत्व आहे. भारत सरकारच्या वतीने १९८४ मध्ये प्रसिध्द केलेल्या सोलापूर जिल्ह्याच्या गॅझेटीयरमध्ये या शहराचा राजकीय इतिहास प्रसिध्द केला गेलेला आहे. त्यानुसार इ.स. १२९४ पर्यंत मागे जाता येते. महमंद तुघलखाने दिल्ली ऐवजी देवगिरी (दौलताबाद ) येथे इ. स. १३३८ मध्ये राजधानी आणली. त्यांनंतर दक्षिणेकडील सरदारांनी बंड पुकारुन अफगान सरदार हसन गंगू याने बहामनी राज्य स्थापण करून येथे राजधानी केली. त्यावेळी सोलापूर जिल्हा त्यांच्याच अधिपत्याखाली होता. महमंद गवान हा प्रधानपदी असताना सोलापूर, परांडा व इतर ११ जिल्हे बहामनी राज्यातच होते. १४५७ मध्ये बहामनी राज्याचे विभाजन होऊन त्यापैकी अहमदनगरच्या निजामशाहीत सोलापूर विभाग सामील केला गेला होता. त्यांनतर विजापूरची आदिलशाही व अहमदनगरची निजामशाही यामध्ये सतत चुरशीच्या लढाया होत असताना हा विभाग १५६२ पर्यंत अधून - मधून दोन्हीही राजवटींच्या अधिपत्याखाली राहिला. इ.स. १७५९ मध्ये मोघल राजवटीत १० लाखांची जहागीर व परांडा किल्ला श्रीमंत नानासाहेब पेशवे यांना देवू करण्यात आला होता. त्यावेळी पेशव्यांनी त्यास मान्यता दिली नाही. मात्र १७६० मध्ये निजामअल्ली खानाने १० लाखाची जहागीर परांडा व नगर येथील किल्ले पेशव्याना देण्याचा लेखी करार करूनही त्याची आंमलबजावणी केली नाही. तेव्हा पेशव्यानी फौज पाठवून नगरचा किल्ला जिंकून घेतला. उर्वरित जहागीर व परांडा किल्ला घेण्यासाठी १७६० मध्येच उदगीर येथे लढाई झाली.

अशारितीने या बार्शी शहराने दिल्लीच्या सुलतानाचे अधिपत्य, बहामनी राजवट, अहमदनगराच्या निजामशाहीची कारकिर्द, इंग्रजांची कारकिर्द अशा अनेक राजसत्तांचे उदय व अस्त पाहून त्या त्या वेळेचे चांगले वाईट अनुभव पचवून जिद्दीने आपले अस्तित्व टिकविलेले आहे.

इ. स .१८८३ मध्ये ब्रिटीश रियासतीत लॉर्ड रिपन हा गव्हर्नर असताना भारतात पहिल्यांदा " स्थानिक स्वराज्य संस्था " संबंधीचा कायदा अस्तित्वात आला. विशेष म्हणजे तत्पूर्वीच १८ वर्षे अगोदर (१८६५ मध्ये) बार्शीची नगरपालिका अस्तित्वात आलेली असून १९४७ मध्ये भारतास स्वराज्य प्राप्त होईपर्यंत इंग्रजांच्या साम्राज्यशाहीत व स्वराज्यप्राप्तीनंतर लोकशाहीत आपला कारभार पाहात आलेली आहे. १९९० मध्ये १२५ वर्षे पूर्ण होवून तिला आपला शतकोत्तर रौप्यमहोत्सवही साजरा करण्याचे भाग्य लाभलेले आहे.

विसोबा खेचर, संत नामदेव , संत ज्ञानेश्वर , प्रल्हादभाऊ महाराज , वामनरावजी गुळवणी , यशवंत महाराज जालनापूरकर इ. सिध्द पुरुषांच्या वास्तव्याने पुनित झालेले गाव आहे. प्रवचन, कीर्तन , यज्ञभाग , कोटिलिगांर्चन , व्याख्याने , गायनसेवा , परिसंवाद, संस्कृत पाठांतर स्पर्धा , गीतापठन , स्तोतपठन, असे विविध धार्मिक - सांस्कृतिक कार्यक्रम भगवंत मंदिराच्या परिसरात वर्षानुवर्षे विविध निमित्ताने साजरे होत असतात. यामधून जनजागृतीचे कार्य होते. बार्शी शहरातच १२ शिवमंदिरे , दक्षिणाभिमुखी मारुतीची मंदिरे, श्री. तुळजाभवानीची २ मंदिरे , श्री. एकवीराई (रेणूका) देवीचे मंदिर इ. हिंदू मंदिरे आहेत.

भगवंत देवस्थानास नानासाहेब पेशवे यांनी मंदिराच्या खर्चासाठी १७६० मध्ये सनद दिलेली अढळते. इंग्रज सरकारने १८२३ व १८७४ मध्ये अशा दोन सनदा भगवंत मंदिरास देऊन भगवंत देवस्थानचे विश्वस्त मंडळ ( पंच कमिटी ) स्थापन करुन देवस्थानचा कारभार पाहीला . त्याचप्रमाणे कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांनीही भगवंत मंदिरास अर्थ सहाय्य केल्याचे आढळून येते.

बार्शी नगरीत वीरशैव लिंगायत समाजाचे १२ मठ आहेत. त्याचप्रमाणे जैनधर्मीयांच्या श्वेतांबर व दिगंबर पंथीय समाजाची मंदिरे , मुस्लिम समाजाची प्रार्थनास्थळे व दर्गे , शीख धर्मिय गुरुव्दार. ख्रिश्चन धर्माचे प्रार्थनामंदिर आहे. शहरातील नागरिक विविध धर्माच्या उत्सवात सहभागी होऊन सर्वधर्म समभावाचा अनुभव घेतात.

## २. बार्शी शहराची सामाजिक व सांस्कृतिक वाटचाल :

बार्शी शहर सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वाचे शहर आहे. बार्शीची हवा उष्ण व कोरडी असून येथील पाऊस बेताचाच आहे. बार्शीकरांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. शेतीतून सर्व प्रकारची अन्नधान्य , गळीताची धान्ये त्याचप्रमाणे नगदी पिके घेतली जातात. व्यक्तीच्या जीवनावर त्याच्या भोवती असलेल्या परिसराचा परिणाम होतो. त्याला अनुसरुनच शेती व्यवसायाचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे. शेती पिकविणे , शेतीत काम करणे, शेतीतून निघणाऱ्या उत्पन्नाला अनुलक्षुन विविध उद्योग वाढविणे असा प्रकार बघायला मिळतो. बार्शीचे सामाजिक जीवन धार्मिक , परंपरागत व रुढीप्रीय आहे. बार्शीकरांना नाविण्याची ओढ आहे. काही नागरिक नव्या विचारांचे व कृतींचे स्वागत करताना दिसतात. शहराच्या एका टोकाला व्यापारी व औद्योगिक व्यवहार हळूहळू वाढतो आहे.

बार्शी शहरामध्ये हिंदू समाजाबरोबरच मुस्लिम , शीख , जैन , बौध्द, नवबौध्द , ख्रिश्चन धर्माचे लोक राहतात. विविध भाषा बोलणारे विविध व्यवसाय करणारे (शेती, नोकरी , उद्योग , व्यापार , मजूरी ) लोक राहतात. मुस्लिम समाजाची लोकसंख्या ही बरीच मोठी आहे. प्रत्येक धर्माचे व जातीचे लोक आपापल्या आचार व विचाराने वागताना दिसून येतात. आपापली संस्कृती अजूनही ते टिकवून आहेत. बार्शी शहराच्या सर्व समाजातील विचारवंत व क्रियाशील कार्यकर्त्यांनी विधायक दृष्टिने काही सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा संस्थांची उभारणी केलेली असून त्याव्दारे समाजाच्या विकासाची वाटचाल होत असते. अशा संस्थांचा परिचय थोडक्यात देता येईल.

१) **गांधी छात्रालय :**

बार्शी तालुका हरिजन सेवक संघातर्फे हरिजन विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने गांधी छात्रालयाची स्थापना १९३४ मध्ये किसनराव शेटे यांच्या नेतृत्वाखाली झाली. आज पर्यंत १४०० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेऊन ते स्वत:च्या जीवनात सुप्रतिष्ठित झाले आहेत.

शासकीय अनुदान , नगरपालिकेची मदत त्याचबरोबर समाजातील दानशुर व्यक्तींच्या सहकार्याने हे छात्रालय चालविले जात आहे.

२) **सोशल क्लब बार्शी :**

लोकांचे मनोरंजन करावे , राष्ट्रीय शैक्षणिक व सामाजिक कार्यक्रम आखून समाजप्रबोधनाच्या कार्यात भाग घ्यावा या उद्देशाने इ.स. १९५२ मध्ये श्री. भाऊसाहेब झाडबुके यांच्या नेतृत्वाखाली या क्लबची स्थापना झाली. पूरग्रस्तांना मदत , गणेशमंडळांना उत्तेजन , राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी कार्यक्रम, गरीबांना मदत , खेळांचे विविध सामने भरविणे , अंधश्रध्दा निर्मूलन , साक्षरता वाढ , व्यसनमुक्ती इत्यादी उपक्रम या क्लबमार्फत चालविले जातात.

३) **बार्शी तालुका हरिजन सेवक संघ :**

अस्पृश्यांना इतर हिंदूच्या बरोबरीने पूर्णपणे समानतेचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी या संघाची स्थापना १९४१ करण्यात आली. धार्मिक स्थळे , सार्वजनिक वाचनालये हरिजनांना खुली करणे , सवर्ण-हरिजन बंधुभाव निर्माण करणे , सहभोजन , समता , दिंडी, हळदीकुंकू इ. कार्यक्रम आयोजित केले. यामध्ये सर्वच जाती धर्मातील , स्तरातील नागरिक झटून काम करीत आहेत.

४) **भारतीय संस्कार केंद्र. :**

भारतीय संस्कृतिची ओळख करुन देणे , समाजसेवा , धार्मिक , शैक्षणिक , सांस्कृतिक उपक्रम पार पाडण्यासाठी तात्यासाहेब देशमुख यांच्या नेतृत्वाखाली १९७४ मध्ये स्थापना करण्यात आली.

५) **रोटरी क्लब ऑफ बार्शी :**

आपापला व्यवसाय सांभाळून समाजामध्ये प्रेमभाव निर्माण करणे , समाजसेवा , समाजजागृती , शैक्षणिक , सामाजिक , उपक्रम इ. कारणासाठी १९५६ मध्ये शहरातील निरनिराळ्या व्यवसायिकांनी व प्रतिष्ठीत मंडळींनी या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचे कार्य अजूनही चालुच आहे.

६) **लायन्स क्लब :**

गेल्या १७ वर्षापासुन झोपडपट्टी सुधारणा , स्वच्छता , रक्तदाते गरीब विद्यार्थ्यांना सहाय्य, मोफत आरोग्य विषयक सोयी , सामुदायिक विवाह . इ. कार्य ही संस्था पार पाडीत आहे .

७) **बार्शी मर्चंटस असोसिएशन लि. :**

शहरातील राजकीय , सामाजिक , धार्मिक असे कोणतेही कार्य असो ते व्यापारी लोकांच्या उदार धोरणामुळे निश्चितपणे फलद्रुप होऊ शकते यावर विश्वास ठेवून ही संस्था स्थापन करण्यात आली.

त्याचप्रमाणे श्री. वर्धमान जैन सार्वजनिक वाचनालय , विरशैव विद्या संवर्धिनी मंडळ, बार्शी गोरक्षण मंडळ, गुरुवार क्लब , दत्त गायन समाज , मराठी साहित्य मंडळ , कमला नेहरु महिला समाजसेवा मंडळ महिला समाज , बार्शी म्युझिक सर्कल, क्रीडोत्तेजक मंडळ , शिवाजी आखाडा, समर्थ व्यायाम शाळा , तत्वज्ञान मंडळ , भारतीय दर्शन परिषद , जैन विद्याभुवन इ. सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील संस्था बार्शी शहरामध्ये समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील आहेत.

बार्शी शहराने आपला शैक्षणिक , औद्योगिक विकास साधत असतानाच सामाजिक, सांस्कृतिक , विकासाकडे दुर्लक्ष केलेले नाही. साहित्य संस्कृती , कला , धर्म , राजकारण, अर्थकारण , व्यापार उद्योग आदि असंख्य क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संस्था जितक्या अधिक आणि प्रभावी असतात. तितका समाज निकोप व विकसित

असतो. याची प्रचिती उपरोक्त संस्थावरुन दिसून येते. बार्शी शहराने समाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावलेली आहे. त्यामुळे शहराची विकास प्रक्रिया सर्वस्पर्शी होऊन नागरी जीवनसुखी संपन्न आणि सर्वांगीण होत आहे.

## ३. शैक्षणिक वाटचाल :

बार्शी शहराची औद्योगिक व व्यापारी पेठ म्हणून जशी ख्याती आहे तशीच अलीकडील काळात शैक्षणिक प्रगतीमुळे हे शहर अधिकच वैशिष्ट्यपूर्ण बनलेली आहे. नाचू कीर्तनाचे रंगी / ज्ञानदीप लावू जगी / या संत नानदेवांच्या उक्तीप्रमाणे भगवंताच्या नगरीत जशी धार्मिक भक्तीरसपूर्ण वातावरणाची शिदोरी आहे तशीच शैक्षणिक सोयीची पाणपोई ही उपलब्ध आहे. या नगरीत शिक्षण क्षेत्राची वाटचाल विविधतापूर्वक व जोमाने सुरु आहे.

बार्शीमध्ये श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी शिक्षण प्रसारक मंडळ, भारत शिक्षण प्रसारक मंडळ , बार्शी एज्युकेशन सोसायटी , नगरपालिका कर्नाटक लिबरल एज्युकेशन सोसायटी , यशवंत प्रसाद पॉप्युलर एज्युकेशन सोसायटी , नव महाराष्ट्र विरया विकास मंडळ इ. शैक्षणिक संस्था सर्व प्रकारचे शिक्षण " पाळणाघरापासुन ते पी.एच.डी. पर्यत " देत आहेत. बार्शी शहर व परिसरामध्ये कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे , श्री. भाऊसाहेब झाडबुके, द. वि. सुलाखे, पी. एम. देशपांडे , भ.ब. बुचडे गुरुजी , शिवाजीराव गुंड या शिक्षणतज्ञांनी शिक्षणाची गंगा घरोघरी नेण्याचे कार्य केलेले दिसून येते.

## ४. व्यापारी व औद्योगिक वाटचाल :

बार्शीला मराठवाड्याचे प्रवेशव्दार म्हणून महत्वपूर्ण स्थान आहे. ऐतिहासिक काळापासून बार्शी हे व्यापारी उलाढालीचे केंद्र आहे. व्यापारात संपादन केलेल्या

संपत्तीतूनच बार्शीचे नागरी जीवन घडविले गेले. व्यापारामुळे नागरिकांना उदरनिर्वाहाचे साधन मिळाले, सार्वजनिक संस्थाना निपधी व नेतृत्व लाभले , कारखानदारीला प्रेरणा , कच्चा माल व भांडवल यांचा पुरवठा झाला. अशारितीने बार्शीच्या भावी चौ फेर प्रगतीचा पाया घातला गेला. बार्शीच्या व्यापारी व औद्योगिक मुलुखगिरीचा इतिहास अभिमानास्पद व रोमहर्षक तर आहेच पण भावी पिढीस अत्यंत मार्गदर्शक आहे. मुंबईकर निर्यातदाराची धनलक्ष्मी आणि मराठवाड्याची कृषी संपत्ती यांचा प्रितीसंगम बार्शीला घडून आला व त्याचबरोबर बार्शीचे भाग्य उजळले . व्यापारामुळे बार्शी पेठ रात्रंदिवस गजबजून गेली.

बार्शीची बाजारपेठ महाराष्ट्रामध्ये प्रसिध्द आहे. कंदार , करकली, लातूर , बीड, नांदेड , परभणी , मुंबई, इ. ठिकाणाहुन कापूस , मिरची , मसाल्याचे पदार्थ , नारळ , कापड, सुपारी , हळद , किराणा माल , चिंच , लोखंड , गुळ, तेलबिया अन्नधान्ये व कडधान्य इ. वस्तु खरेदी करण्यासाठी व्यापारी येत असत. बार्शी कापडाचा व्यापार , सराफ बाजार , स्टेशनरी वस्तू , कृषी माल , औ ` , लाकुड बाजार , लोखंड व्यापारासाठी प्रसिध्द आहे. त्याचप्रमाणे विडी कारखानदारी , तेलगि ण्या , दाळ कारखाने , औद्योगिक वसाहत यासाठीही प्रसिध्द आहे.

## ५. बार्शी शहराने साहित्याला दिलेले साहित्यीक व साहित्यसेवा :

संतवाङ्मयापासून तंत वाङ्मयापर्यंत सर्व प्रकारचे साहित्य या भगवंत नगरीत लिहिले गेले. मराठी भाषेतील पहिली लावणी " मन्मथ कवी " ने लिहिली. त्यामुळे " शाहिर वाड.मयाचा " जनकाचा मान बार्शीला मिळाला. काव्य , कथा , लघुनिबंध , नाटके , चरित्र , अध्यात्मिक व धार्मिक साहित्य , गणित बालवाङ्मय , इत्यादी साहित्य प्रकारांमध्ये बार्शीचे योगदान मोठे आहे. बार्शीने अनेक नामवंत लेखक कवी व विचारवंत जन्माला घातले. शाहीर अमर शेख, अनिल डांगे , श्री. बोराडे , श्री. रा. टिकेकर . डॉ. व

दि. कुलकर्णी प्राचार्य नि. ना. रेळेकर , डॉ. गंगाधर मोरजे , डॉ. पंडित , आवळीकर , बाबा कदम, डॉ. एम जी. नेने , डॉ. एस.एम. बर्डे , श्री. अे.बी. पुराणिक , पन्नालाल सुराणा, श्री. शं.बा. दिक्षित , के.ना. देशपांडे , प्राचार्य इंगळे , चंद्रकांत मोरे, राजेंद्र दास इ. नामवंत लेखक बार्शीमध्ये होऊन गेले व आहेत.

## ६. वैद्यकिय सेवेची वाटचाल :

बार्शी शहरामध्ये सुरुवातीपासुनच वैद्यकिय सुविधा आधुनिक पध्दतीने दिली जात आहे. बार्शी शहरामध्ये बार्शी मॅट. अॅन्ड जन. को. ऑप. हॉस्पीटल , डॉ. कर्मवीर जगदाळे मामा हॉस्पीटल , हिरेमठ हॉस्पीटल , जवाहरलाल हॉस्पीटल , नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पीटल इ. हॉस्पीटल इमाने इतबारे मानवतेची सेवा करीत आहेत. त्याचप्रमाणे असंख्य खाजगी दवाखाने ही आहेत. त्याचबरोबर रेडक्रॉस सारख्या संस्थेची श्रीमान रामभाई शहा रक्तपेढीही आहे. बार्शीने डॉ. फ्लेचरसो, डॉ. सेसील , डॉ. बी.एम. नेने, डॉ. वखारिया डॉ. बी. वाय. यादव , डॉ. जे एम, माढेकर , डॉ. जवाहर पुनामिया , डॉ. मोरे डॉ. कश्यपी , डॉ. पाटील डॉ. कोठारी , डॉ. प्रकाश डाळे इत्यादी नामवंत व तज्ञ डॉक्टरांना जन्म दिला. बार्शीचे कॅन्सर हॉस्पीटल हे ग्रामीण भागातील एकमेव हॉस्पिटल आहे. बार्शी शहरामध्ये सर्व प्रकारच्या रोगावर उपचार केला जातो.

## ७. बार्शी शहराचे सहकारी चळवळीतील योगदान :

निकोलसन मॅक्लेगन कमिटिच्या पाहणीनंतर शेतकरी व जनतेच्या आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सहकाराच्या माध्यमातून जनतेनेच काम करावे . या हेतूने ब्रिटीश सरकारने सहकार सोसायट्यांचा कायदा १९०४ साली केला . या कायद्यानंतर बार्शी शहरातील पहिली. सहकारी संस्था कै. भाऊसाहेब साने यांनी १९०६ मध्ये बार्शी

अर्बन को. ऑप क्रेडीट सोसायटी लि. या नावाने काढली. आज बार्शी शहरात १६ प्रकारच्या जवळजवळ १२५ सहकारी संस्था कार्यरत आहेत. ग्राहक , पतसंस्था , महिला , औद्योगिक संस्था , गृहनिर्माण , कामगार, दूध , नागरी बँका इ. प्रकारच्या सहकारी संस्था वैशिष्टयपूर्ण आहेत.